# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
# भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. :०२२ – २४०९३११०
०२२ – २४०३१४९८
फॅक्स क्र : ०२२ – २४०९३११०
www.cpfmseb.2011@gmail.com
website : www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९.


---

**क्र.लेवि/भनिनि /कनिवेयो/डी/ 386** **दिनांक: २६.०५.२०१७**

## परिपत्रक क्र. २०५

**विषय : "कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५" चे निवृत्ती वेतन प्रस्ताव तातडीने भ.नि.नि. कार्यालय धारावी येथे पाठविण्या बाबत.**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की क्षेत्रिय कार्यालयाकडून निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव पाठविताना परिपत्रक क्र. १९५ (अ) दि. ०९ नोव्हेंबर २०१६ च्या चेकलिस्ट प्रमाणे प्रस्ताव पाठविले जात नाहीत. प्रस्तावामध्ये अनेक त्रुटी असताना सुध्दा प्रस्ताव या कार्यालयास पाठविले जातात. परिणामी त्रुटी पूर्ततेसाठी सदरचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालास परत पाठवावे लागतात. त्यामुळे कर्मचा-यास निवृत्ती वेतन मिळण्यास विलंब होतो. **ब-याच वेळा प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येतात.**

१) प्रस्तावावरती / अर्जावरती कर्मचा-याची व नियंत्रणाधिका-यांच्या सहया नसतात. तसेच उप व्यवस्थापक / व्यवस्थापक (मा.सं.) आणि उप व्यवस्थापक / व्यवस्थापक (वि.व ले.) यांच्या शिक्क्यावरती सही नसते.

२) चेकलिस्ट क्र. ७ (१० क) प्रमाणे फोटोच्या पाठीमागे सक्षम अधिका-यांची सही व कर्मचा-याचा क.नि.वे. क्र. नमुद केलेला नसतो.

३) चेकलिस्ट क्र. ११ (१० क) प्रमाणे १२ महिन्याच्या कालावधीत एकापेक्षा अधिक महिन्याचा पगार एकत्रित अदा केला असल्यास महिनावार क.नि.वे. (ई.पी.एफ.) कपातीचे विवरण पत्र लेखा परिक्षित करुन पाठविताना रोख प्रमाणक क्रमांक / दिनांक लिहिला जात नाही.

४) चेकलिस्ट क्र. १२ (१० क) मध्ये सुध्दा निवृत्तीपुर्व ६० महिन्याच्या वेतनाचा तपशिल देताना एका पेक्षा अधिक महिन्याचा पगार एकत्र दिला असेल तर त्याचा सुध्दा महिनावार क.नि.वे. (ई.पी.एफ.) चा तपशिल रोख प्रमाणक क्रमांक / दिनांक विवरण पत्रात दाखवला जात नाही.

५) चेकलिस्ट क्र. २५ (१० ड) प्रमाणे ६० व्या वर्षी सेवानिवृत्त होणा-या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे प्रस्ताव वयाची ५८ वर्ष पूर्ण झाली तरी त्वरीत या कार्यालयास पाठविले जात नाहीत. तरी सदरचे प्रस्ताव ५८ वर्षे पूर्ण होताच त्वरीत भ.नि.नि. कार्यालयास पाठविण्यात यावेत.

अशाप्रकारे चेकलिस्ट प्रमाणे प्रस्ताव मासं विभागाने तपासुनच भ.नि. निधी विभागास पाठवावेत.

**तसेच यापुढे प्रस्ताव पाठवताना खालील प्रमाणे काळजी घेण्याविषयी क्षेत्रिय भ.नि.नि. आयुक्त बांद्रा मुंबई यांनी सुचना दिलेल्या आहेत.**

१) निवृत्ती वेतन प्रस्ताव कर्मचारी निवृत्त झाल्यापासून (रिलिव्ह ऑर्डरसह) एका आठवडयात या कार्यालयास पाठवावेत. कर्मचारी निवृत्त होण्या अगोदर एक महीन्या पासून कर्मचा-या कडून प्रस्ताव भरुन घेवून इतर सर्व कागदपत्रासह पाठविण्याची तयारी ठेवावी. जेणेकरुन कर्मचा-यास निवृत्ती वेतन वेळेवर मिळेल.

२) मृत कर्मचा-याचे वारसाचे निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव ई.डि एल.आय. च्या प्रस्तावासोबतच पाठवावेत.